MHSO130021752013

# निशाणी क्र. ४३ वरील आदेश

वादी ने सदरचा अर्ज अबेटमेंट सेट असाईड व वारस रेकॉर्डवर घेण्याकरिता दिला आहे. त्यामध्ये त्यांचे असे कथन आहे की, सदरचा दावा दाखल झाल्यानंतर दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादी नं.१ उत्रेश्वर बाबु सावंत हे दिनांक २८/१२/२०२० रोजी उस्मानाबाद येथे मयत झाले आहेत. त्यामुळे मयत प्रतिवादीचे वारस रेकॉर्डवर घेवून दाव्याचे काम पुढे चालणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. वादीस मुदतीत प्रतिवादी क्र.१ मयत झाल्याची माहिती मिळाली नाही, त्यामुळे मुदतीत दुरुस्ती करता आली नाही. त्यामुळे त्यांना सदरचे वारस रेकॉर्डवर घेण्यास उशीर झालेला आहे. त्यामुळे दाव्यात तांत्रीक उणीव राहू नये म्हणून झालेला उशीर माफ होऊन व दाव्याचा गुणदोषांवर निकाल होणेसाठी अबेटमेंट सेट असाईड करुन मयतांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे. सदर अर्जास प्रतिवादींनी म्हणणे देऊन अर्जास विलंब झाल्याने नामंजूर करण्याची विनंती केली.

२. अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजुस ऐकले. वादीने सदरचा दावा हा साठेखतावरुन खरेदीखत होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. सदर प्रतिवादी नं.१ यांचा मृत्यु झाला असल्याबाबत प्रतिवादींनी त्यांचा मृत्युचा दाखला निशाणी क्र.४० च्या पुरसीससोबत जोडलेला आहे. त्यांची पाहणी केली असता त्यावर प्रतिवादी क्र.१ हे दिनांक २९/१२/२०२० रोजी मयत झाल्या असल्याचे दिसून येते. वादीने सदर मयताचे वारस दिनांक २९/०३/२०२१ पर्यंत रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते परंतु, त्यांनी सदर प्रतिवादी क्र.१ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास सुमारे १ वर्षापेक्षा जास्त विलंब केला असल्याचे दिसून येते. सदरचा दावा प्रतिवादी क्र.१ यांचे विरुध्द अबेट झालेला आहे.

३. जरी असे असले तरी, सदरचा दावा हा सन २०१३ साली दाखल झालेला असून वादी व प्रतिवादी यांचे हक्क हितसंबंध सदर दाव्यामध्ये गुंतलेले आहेत. त्यामुळे वादीचा सदरचा निशाणी क्र. ४३ चा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, वादीचा अर्ज निशाणी क्र.४३ मंजूर करण्यात येतो व त्यांना मयत प्रतिवादी क्र.१ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी देण्यात येत आहे.

Sd/-
(एस.बी. विजयकर)
सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.

बार्शी
दिनांक २४/०१/२०२४.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S.R. Barangule |
| (b) | Court | : | S.B. Vijaykar,<br>Jt.C.J.J.D.&J.M.F.C.<br>Barshi. |
| (c) | Judgment /Order declared on | : | 24/01/2024 |
| (d) | Judgment /Order signed by P.O. on | : | 24/01/2024 |
| (e) | Judgment /Order uploaded on | : | 24/01/2024 |